# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper* ₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 OCTOBER | No. 09


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**नीतिसूत्रे : १३:१-१०**

१. सुज्ञ पुत्र बापाचें शिक्षण ऐकतो; पण धर्मनिंदक वाग्दडाला मोजीत नाही.

२. तोंडच्या शब्दांनी मनुष्य स्वतः चांगले फळ भोगितो; पण कपटी इसमांच्या जिवाला बलात्काररुप फळ मिळते.

३. जो आपले तोंड संभाळितो तो आपला जीव राखितो; जो आपले तोंड वासतो त्याच्यावर अरिष्ट येते.

४. आळशाच्या जिवाला हाव असते तरी त्याला कांही मिळत नाही; उद्योग्यांचा जीव पुष्ट होते.

५. धार्मिकाला असत्याचा तिटकारा असतो; परंतु दुर्जन अप्रतिष्टा व निंदा यांस कारण होतो.

६. धार्मिकता सात्त्विक मार्गाने चालणाऱ्यांचे रक्षण करते; दुष्टता पातक्यांना उताणा पाडिते.

७. कित्येक असे आहेत की ते श्रीमंतीचा आव घालितात तरी त्यांच्याजवळ काही एक नसते कित्येक असे आहेत की ते गरिबी दाखवितात तरी त्यांच्यापाशी बहुत धन असते.

८. मनुष्याच्या जिवाची खंडणी त्याचे द्रव्य होय; परंतु दरिद्र्याला धमकी ऐकावी लागत नाही.

९. धार्मिकांची ज्योति प्रज्वलित असते; दुर्जनांचा दीप मावळतो.

१०. गर्वामुळे भांडणे मात्र होतात; पण चांगली मसलत घेणाऱ्यांजवळ ज्ञान असते.

## आपल्या विचाराचा भाग दावीदाद्वारे निष्कर्ष



## Our Thoughts Matter: Reflections from David

*मानद् प्रमुख संपादक, रेव्ह. अॅन्जेलीन सेल्वाकुमारी*

सर्वांना आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या, येशू ख्रिस्ताच्या अतुल्य नामात शुभेच्छा!

**एको ऑफ हिज कॉल**च्या विस्तारीत कुटुंबातील सदस्यांशी मासिकाच्या माध्यमातून दर महिन्याला जोडले जात असल्याच्या मला आनंद होत आहे. प्रभु करो आणि त्याच्या आपल्या जीवना विषयीचा उद्देश पूर्ण करण्यास आणि त्याच्या पुर्नआगमना करिता तयार होण्यासाठी तो आपले पुढारपण आणि मार्गदर्शन करीत राहो.

अमेरिका देशाचे संस्थापक पिता असे मानले गेलेले आदरणीय बेंजामिन फ्रँकलीन यांनी एकदा असे विधान केले, ''तुम्ही योजना आखण्यात जर अपयशी ठरलात, तर तुम्ही अपयशी ठरण्यास योजना करीत आहात'' हे अतिशय गूढ-खोल परिणामकारी शब्द आहेत. योजना हा आपल्या जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे.

काहीजण योजना करण्यात आणि अंमलबजावणी यात वरचढ असतात.

असा एक दुसरा गट आहे जो अजीबात योजना करीत नाही, तर प्रवाहाबरोबर जाणे निवडतो.

(...पान ३ वर)


## एको ऑफ हिज कॉल



### यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

*पाच मिनिटांचा संदेश*

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✲ कृपा करुन सबक्राईब करा ✲

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
HON. MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran



EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call


## "परमेश्वर तुम्हांसाठी लढेल, तुम्ही उभे राहा (निर्गम १४:१४)

प्रिय मित्रांनो,

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अतुल्य नामात तुम्हा सर्वांना शुभेच्छा व्यक्त करीत आहेत. आम्ही पास्टर एस्. सॅम सेल्वाराज यांचे आत्मचरित्र तयार करण्याच्या प्रक्रीयेत आहोत. मागील ५५ वर्षांच्या **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याद्वारे जर तुम्ही आशीर्वादीत झाला असाल, आणि पास्टर एस. सॅम सेल्वाराज यांच्या द्वारे आणि त्यांच्या विविध सेवां द्वारे जर तुमची प्रभु येशू ख्रिस्ताशी भेट झाली असेल, तर त्यांच्या आत्मचरित्रात तुमचे अनुभव जोडण्यास आम्ही तुम्हाला आमंत्रीत करीत आहोत. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

२०२४च्या वर्ष समाप्तिच्या जवळ येत असताना आम्ही तुमच्या सहीत देव अगदी वेळो-वेळी पुरवित आलेल्या अनिर्वाच्य आणि अवर्णीनिय मदती बद्दल देवाची कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. अनेक प्रसंगी त्याने आमच्या कार्याकरीता आधार म्हणून तुमचा उपयोग करुन घेतला. तोच देव, प्रभु येशू ख्रिस्त आज तुमच्यासाठी उपलब्ध आहे; त्यामुळे तुमच्या जीवनात चमत्कार घडण्यास तुम्ही त्याजमध्ये विश्वास ठेवून अवलंबून राहू शकता.

या अंकाद्वारे आमच्या सेवाकार्यातील पुढील विभागांकरीता तुमच्या आग्रही प्रार्थनांची अपेक्षा करीत आहोत.

- **एको ऑफ हिज कॉल** मासिक प्रत्येक महिन्याला (१६ भाषांमध्ये) प्रसिद्ध करण्याकरीता अंदाजे ७५ व्यक्ति गुंतलेल्या असतात. संदेश तयार करणे, टंकलेखन, भाषांतर, प्रुफ रिडींग, पानांची रचनात्मक मांडणी, मुद्रण छपाई, पानांची जोडणी करणे, लेबल लावणे, आणि ठरलेल्या दिवशी मासिके टपाल खात्यांत पोहचविणे, त्या व्यतिरिक्त ईमेल पाठविणे अशा जबाबदाऱ्या त्यांना पार पाडाव्या लागतात. सेवा कार्यात वाढ झालेली आहे, त्यामुळे शत्रू सैतानाने या बंधु-बहिणींना, आजार, कौटुंबिक समस्या, आर्थिक अडचणी याद्वारे त्रास देण्यास सुरुवात केली आहे. कृपया ७५ जणांना आणि त्यांच्या कुटुंबियांना तुमच्या प्रार्थनेत उचलून धरा.
- वेळ जस-जशी सरत आहे, कामगारांची मनोधारणा, सरकारी धोरणे आणि आमच्या मित्राद्वारे मिळणाऱ्या आर्थिक मदतीतील उतरती कळा यांचा परिणाम प्रशासनातील आवाहनात वाढ झाली आहे. वर्तमानातील अनेक विश्वासीजन, भरभराट-उत्कर्ष, चुकीचे तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक जगातातील आकर्षण यामध्ये हेलकावे खात आहेत; परिणामी प्रामाणीक अशा देवाच्या सेवकांकडे दुर्लक्ष होत आहे. अशा परिस्थितीचा आमच्यावर परिणाम झाला आहे. परंतु देव त्याच्या सेवकांची आणि सेवाकार्याची काळजी घेण्यासाठी विश्वसनीय आहे. या परिस्थितीत बदल घडून यावा यासाठी कृपया प्रार्थना करा.
- आमच्या मंडळ्या, **नहेम्या बायबल कॉलेज,** पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेला थियॉलॉजीकल अभ्यासक्रम, बिबलीकोर अभ्यासक्रम, यूट्युब सेवा, **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** आणि मुद्रणालय परिणामकारक रित्या कार्यरत आहे. तथापी या सर्व कार्यास आत्मिक आणि आर्थिक उत्तेजनाची गरज आहे.

- आम्हाला आमच्यासह मिशन क्षेत्रांत, मंडळ्यांत, मुद्रणालयात, कार्यालयात, शाळेत आणि बायबल कॉलेजमध्ये एकत्रीत कार्य करणाऱ्या समर्पित कामकरणाऱ्यांची गरज आहे.
- आमच्या हिन्दी आणि तामिळ **नहेम्या बायबल कॉलेजम**ध्ये विद्यार्थी प्रवेशासाठी आवाहान वाटते. काही पुढारी त्यांच्या तरुणांना बायबल कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याकरिता अनेक कारणांमुळे नाखुष असतात. तरी देखील, आम्ही त्यांना वेगवेगळ्या जागी पाठविण्या आगोदर अत्यंत काळजीपूर्वक त्यांना शिकवितो, प्रशिक्षण देतो, त्यांची खाण्याची आणि इतर गरजा पुरवितो, जेणेकरुन त्यांना देवाने केलेल्या पाचारणानुसार सेवा करणे शक्य व्हावे. प्रशिक्षणाकरिता आम्ही कोणतीही फी आकारित नाही. आम्ही प्रशिक्षित केलेले विद्यार्थी आता मिशन क्षेत्रात ताऱ्याप्रमाणे चमकत आहेत. याहि समस्येकरिता प्रार्थना करा.

या वर्षी सप्टेंबर ते डिसेंबर या महिन्यासाठी अनेक बाह्य सेवाकार्यांचे आयोजन केले आहे. या कार्याच्या सुरक्षिततेे करिता प्रार्थना करावी.

आपण सेवा कार्यात एकत्रीत प्रवासकरित असताना असलेल्या तुमच्या आधाराबद्दल मान्यता देत आहोत. तुम्ही उपलब्ध वेगवेगळ्या माध्यमांद्वारे देत असलेल्या आर्थिक दानांची पोहोचपावती देण्यासाठी सर्वस्वी प्रयत्नकरित आहोत. आमच्याकडून उत्तर प्राप्त न झाल्यास, पावती प्राप्त न झाल्यास किंवा मासिक प्राप्त न झाल्यास कृपया ९८४१०७१८५१ किंवा ९८४१२७१८५८ या क्रमांकावर संपर्क साधावा. आम्ही तुम्हांस सहकार्य करण्यास तयार आहोत.

देव तुम्हां सर्वांना विपुल आशीर्वाद देवो.

येशू ख्रिस्त मध्ये तुमचे दास.

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 9841271858/9841071858
E-mail : sam@echoofhiscall.org

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो – लक्ष द्या

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

मी विचार करते, तुम्ही कोणत्या वर्गात अहात? बायबल आपणास नीतिसूत्रे १९:२१ या वचनात आठवण करुन देते, **"मनुष्याच्या मनात अनेक मसलती येतात; परंतु परमेश्वराची योजना स्थिर राहते."**

आपल्या भविष्याकरिता आपण असंख्य योजना करतो, शिक्षण, विवाह, आपत्य, भवितव्य आणि मालमत्ता जमविणे इत्यादी. आपण सतत विचार करीत व्यावहारीक डावपेंच आखतो. तथापी सरतेशेवटि देवाची इच्छा आणि त्याला हवे तेच सफल होते. नीतिसूत्रे १६:९ हे वचन असे स्पष्टपणे सांगते; **"मनुष्याचे मन मार्ग योजिते पण परमेश्वर त्याच्या पावलांस मार्ग दाखवितो. मनुष्याचे मन विचार करते."** असे तामिळमध्ये भाषांतर आहे. जे देव आपले मार्ग स्थिर करतो यावर भर देते.

विचारकरणे हि देवाने मानव जातीला दिलेली एक असामान्य अशी देणगी आहे. मानसशास्त्रज्ञ देखील विचार अतिशय शक्तिशाली असतात याला खात्रीपूर्वक संमती देतात. विचार हे आपल्या कृति आणि भावना यांना आशा देतात – करावयास लावतात. यामुळेच बायबल आम्हांस सल्ला देते – "अंत:करणाचे रक्षण कर", कारण आपण जे चालू देतो. ते विचारांना आकार देते आणि विचार आपल्या बोलण्यावर आणि वागण्यावर प्रभाव पाडतात. त्यामुळे विचार करणे हा आपल्या जीवनाचा भाग आहे.

एका विचारात आपल्या जीवनाचा मार्ग बदलण्याची ताकद असते. देव आपल्या बद्दल काय विचार करतो ते पाहू या. यिर्मया २९:११ **"तुम्हांविषयी माझ्या मनात संकल्प आहेत."** देवाकडे केवळ योजनाच नाहि, तर आपल्या विषयी विचार संकल्प, याद्वारे स्पष्ट होते तो आपल्या विषयी विचार करण्यात सक्रीय आहे. जगाची निर्मिती करणारा आणि जगातील घटना चालविणारा जो त्याला तुमच्या विषयी विचार आहेत, याची कल्पना करवते कां? तो केवळ माझ्या भविष्या विषयीच करीत नाही तर माझ्या पिढी विषयी देखील विचार करितो. ज्या देवाला माझ्या विषयीची काळजी आहे मजविषयी विचार करतो त्या देवावर मी विश्वास ठेवितो. यामुळे मला पुन: खात्री पटते.

बायबल मला शिकविते की, **"माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नव्हेत; माझे मार्ग तुमचे मार्ग नव्हेत, असे परमेश्वर म्हणतो."** (यशया ५५:८) असे कां? कारण देवाचे आपल्याकडे पाहाणे आणि आपल्या विषयी विचार करणे हे आपले स्वत:कडे पहाणे व विचार करणे यापेक्षा पूर्णपणे वेगळे असते.

उदाहरणार्थ, शास्ते ६ अध्यायातील गीदोनांचा विचार करा. तो मिद्यान्यांपासून बचाव व्हावा म्हणून द्राक्षकुंडांत गव्हाची मळणी करीत होता. त्याला उघड्यावर

मळणी करण्याचे धैर्य नव्हते. म्हणून तो लपून ती करीत होता. यावरुन गीदोना विषयीची वस्तुस्थिती कळून येते. तथापी देवाने त्याची भेट घेतली; तेव्हा त्याच्याशी कसा बोलला ते पहा –

शास्ते ६:११–१२ **“गिदोन मिद्यान्यांपासून बचाव व्हावा म्हणून द्राक्षाकुंडात गव्हांची मळणी करीत होता; त्यास परमेश्वराच्या दूताने दर्शन देऊन म्हटले, हे बलवान वीरा, परमेश्वर तुझ्या बरोबर आहे.”**

देव गिदोनाचा ‘‘बलवान वीर’’ असा उल्लेख करीत असताना, गिदोन मात्र शास्ते ६:१५ मध्ये स्वत:चे अवलोकन अगदी वेगळे करितो.

तो देवाला म्हणतो, **“प्रभु इस्त्राएलांस मी कसा सोडविणार? माझे कुळ मनश्शेवंशांत सर्वात कनिष्ठ आहे; तशात मी आपल्या वडिलांच्या घराण्यात अगदी कनिष्ठ आहे.”**

गिदोन स्वत:स एक दुर्बल आणि



*देवाने गिदोनाला दर्शन दिले*

कनिष्ठ असा पहात आहे, तरी देव त्याजकडे ‘बलवान वीर’ त्याच्या लोकांची सुटका करण्याकरिता आणि त्याच्या क्षत्रुंना हरविण्यासाठी ठरविण्यात आलेला– निवडीलेला असे पहातो.

## पुढचा विचार करणे!

काहीजण देवाच्या वेळेची वाट पहाण्या ऐवजी स्वत:च्या योजना अमलात आणण्याकरिता अकालीक विरुद्ध कृति करतात. मोशेचा विचार करा. जेव्हा त्याने दोन इस्त्राएली एकमेकांशी मारामारी करताना पाहिले, तो त्यांना सोडविण्याच्या उद्देशाने मधे पडला हि देवाची ठरलेली वेळ नव्हती. या दोन इस्त्राएलींचे भांडण सोडविण्याच्या प्रयत्नाचा शेवट अरिष्टात झाला.

## विचारांत सामर्थ्य!

आपले विचार असामान्य असे शक्तिशाली असतात; ते सार्थपणे आपल्या वर्तणूकीवर आणि भावनांवर प्रभाव पाडतात. मानसशास्त्रज्ञ हा प्रभाव कबुल करतात कारण त्यामुळे जाणून घेण्याच्या वागणूकीच्या पद्धतीत महत्त्वाची भूमिका बजावतो. विचार आपल्या जीवनाच्या महत्त्वाच्या बाजूवर अमल करतात. त्यामुळेच बायबल आपण आपल्या मनाचे रक्षण करण्याचा सल्ला देते. आपल्या मनांत ज्या गोष्टि येण्यास आपण परवानगी देतो त्याचाच प्रभाव आपल्या विचार करण्यावर पडतो. एक चूकीचा केलेला विचार आपल्या संपूर्ण जीवनाचा मार्ग रुळावरुन घसरवू शकाते. आणि देवाच्या आपल्या जीवनाविषयी असलेल्या योजना आणि उद्देश यापासून दूर करु शकतो.

## दाविदाचे अंतरंग!

दाविद देवाला संतोषविण्याचा प्रयत्न करणारा आणि ज्याचा जीवनाचा देव केंद्रबिंदु होता असा व्यक्ति होता. शौल त्याचा निष्ठुरपणे पाठलाग करीत असताना देखील देवाने त्याला शौलाच्या हाती दिले नाहि. उलट तीन पेक्षा अधीक प्रसंगी देवाने शौलाला दाविदाच्या तावडीत दिले. तथापी दाविदाने शौल हा ‘‘देवाचा अभिषिक्त आहे.’’ असे बोलून त्याला इजा न करणे ठरविले. शौल जरी त्याच्या दैवी नेमणुकीला अनुसरुन चालत नव्हता तरी देखील दाविद शौलावरील देवाच्या अभिषेकाचा मान राखत होता.

एकावेळी दाविद दरवाजे व अडसर असलेल्या केईला नगरात गेलेला असताना, शौलाला वाटले तो आयता या तटबंदीच्या नगरात आयताच कोंडला गेला आहे. त्याला पकडण्याची हिच उत्तम संधी आहे. (१ शमुवेल २३:७) तरी देखील देवाने दाविदाचा बचाव केला. परंतु अध्याय २६ मध्ये शौल दाविदाच्या अगदी जवळ पोहचला होता, परंतु देवाने पळून जाण्यास त्याला मदत केली.

अध्याय २६ मध्ये शौल दाविदाचा पाठलाग करीत जवळ आलेला असताना, दाविदाला त्याला ठार मारण्याची संधी

(...पान ६ वर)

नहेम्या बाईबल
निवासी कॉलेज
वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम
माध्यम : तमिळ
Recognised by International Christian Leaders &
Senior Pastors for the past 55 years
प्रवेशा करिता त्वरा करा !
ईश्वरविद्या डिप्लोमा
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ ऑक्टोबर:** अडखळणे असताना देखील **एको ऑफ हिज कॉल** सेवेला देवाचे राज्य उभारणयस शक्ति दिली.

**२० ऑक्टोबर:** **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** आणि प्रिंसिपल, स्टाफ आणि विद्यार्थी वर्गाला आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२१ ऑक्टोबर:** **एको ऑफ हिज कॉल** मासिक सेवेस आधार देत असलेल्या सर्व सहसंपादकांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२२ ऑक्टोबर:** **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**साठी नवीन प्रिंसिपल देऊन आशीर्वादीत केले.

**२३ ऑक्टोबर:** आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये मासिक छापून ते सर्व मिशन क्षेत्रांना पाठविणे शक्य होऊ दिले.

**२४ ऑक्टोबर:** **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्य आणि सर्व स्टाफला सुरक्षित ठेविले.

**२५ ऑक्टोबर:** **एको ऑफ हिज कॉल** युट्यूब माध्यमाद्वारे दिल्या जाणाऱ्या मनन पर संदेशांच्या परिणामामुळे प्राप्त होत असलेल्या सांक्षीबद्दल.

**२६ ऑक्टोबर:** कुशल आणि समर्पित अशा कारागीरांद्वारे मुद्रणालय सतत कार्यरत आहे.

**२७ ऑक्टोबर:** आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांवर दर्शवित असलेल्या दयेबद्दल कृतज्ञता व्यक्त करित आहोत.

**२८ ऑक्टोबर:** आमच्या विविध सेवाकार्यासाठी प्राप्त होत असलेल्या त्याच्या मार्गदर्शनाबद्दल.

**२९ ऑक्टोबर:** पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या बायबलकोर आणि थियॉलॉजीकल अभ्यासक्रमातील वाढीबद्दल आनंद व्यक्त करीत आहोत.

**३० ऑक्टोबर:** **नहेम्या बायबल कॉलेज** व्यवस्थित चालण्यास पुरवित असलेल्या दयेबद्दल कृतज्ञ आहोत.

**३१ ऑक्टोबर:** आमच्या सर्व मिशनरी आणि त्यांच्या कुटुंबावरील आशीर्वादाबद्दल धन्यवाद देत आहोत.

**०१ नोव्हेंबर:** आमच्या वरिष्ठ पाळकांच्या वेगवेगळ्या सेवेद्वारे शुभवर्तमान जाहिर करण्यातील समर्पितपणाला दाद देत आहोत.

**०२ नोव्हेंबर:** मुख्य मंडळीतील पुरुषांच्या सभेवर आशीर्वादाची अपेक्षा करीत आहोत.

**०३ नोव्हेंबर:** मागील महिन्यात आमच्या सर्व आत्मिक आणि आर्थिक गरजा पुरविल्याबद्दल.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ नोव्हेंबर:** जगभरातील सर्व पाळक आणि मिशनरींच्या सुरक्षिततेसाठी.

**०५ नोव्हेंबर:** युक्रेन आणि रशिया यांमधील युद्ध बंद व्हावे; ऐक्य आणि शांति प्रस्थापीत व्हावी.

**०६ नोव्हेंबर:** सर्व ख्रिस्ती संस्था आणि प्रार्थना मंदिरांच्या सुरक्षतेसाठी.

**०७ नोव्हेंबर:** सर्व विश्वासीजन आत्म्यांत उत्तेजीत व्हावेत.

**०८ नोव्हेंबर:** बहिण जेसी वीणा सॅम सेल्वाराज यांच्या प्रकृति स्वास्थासाठी.

**०९ नोव्हेंबर:** जगभरातील सर्व आत्मिक पुढाऱ्यांकरिता.

**१० नोव्हेंबर:** देवाने आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहून पूर्ण करण्यास मार्गदर्शन करावे.

**११ नोव्हेंबर:** मिशनक्षेत्रातील सर्व सेवकांकरिता.

**१२ नोव्हेंबर:** देवाने **एको ऑफ हिज कॉल** सेवाकार्याकरिता आणखीन समर्पित सेवक पुरवावेत.

**१३ नोव्हेंबर:** मासिक वेतन, मुद्रणालयासाठी सामग्री, टपाल खर्च, सेवे संबंधीत प्रवास खर्च आणि इतर आर्थिक गरजानकरिता.

**१४ नोव्हेंबर:** दुष्कर्म करणाऱ्यांची आणि व्यसनाधीन असणाऱ्यांच्या बंध मुक्ततेसाठी.

**१५ नोव्हेंबर:** जगभरातील **तरुण वर्ग आणि लेकरे** यांच्याकरिता प्रार्थना करणाऱ्या आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर युथ ॲण्ड कीड केअर मिनिस्ट्री**मध्ये अधीक लोक सहभागी व्हावेत.

**१६ नोव्हेंबर:** सर्व धर्मियांच्या ऐक्याकरिता.

**१७ नोव्हेंबर:** दुर्लक्षित विभागात शुभवर्तमान प्रसाराकरिता मार्ग मोकळे व्हावेत.

**१८ नोव्हेंबर:** आमच्या पुढाऱ्यांवर शासकीय अधिकारी आणि अधिकार मंडळीवर दयेची दृष्टि असावी.

(पान ४ वरुन)

प्राप्त झाली होती, परंतु अभिषिक्तावर न उचलण्याचा निर्णय त्याने व तेथून निघून जाणे त्यांने पसंद केले. अशा सर्व परीक्षांमध्ये, दावीद जीवनात विश्वासू राहिला. शौलाने कितीही आवेशाने दाविदाला ठार मारण्याचे प्रयत्न केले, देवाने सतत त्याचे रक्षण केले. १ शमुवेल २३:१४ या वचनात नमूद केल्याप्रमाणे, **"...शौल त्याचा शोध नित्य करीत असे; पण देवाने त्यास त्याच्या हाती लागू दिले नाही."**

आपण देवावर प्रेम करितो; त्याजवर भरोसा ठेवितो आणि तो आपल्यावर प्रेम करितो व आपली काळजी घेतो. आणि आपण त्याजकडे मागतो त्याहून अधीक देण्यास तो समर्थ आहे तरी देखील मनात संशय प्रवेश करतो, परिणामी कवडीमोलाचे निर्णय घेतो; कधी कधी अशी वेळ आपल्या जीवनात येत असते, तशीच ती दाविदाच्या जीवनात आली.

१ शमुवेल २७वा अध्याय दाविदाच्या जीवनातील त्याच्या सर्वात खालच्या दर्जाच्या निर्णयाचे कुतुहल निर्माण करणारे चित्र उभे करितो.

मराठी बायबलमध्ये त्याची सुरुवात "दाविद आपल्या मनात म्हणाला", अशा शब्दांनी होते. आपण शौलाच्या विरुद्ध आता उभे राहू शकणार नाही असे समजून तो आपल्यावर वरचढ होईल अशी भीती अचानक त्याला वाटू लागली, परिणामी त्याने त्याच्या बरोबर असलेल्या लोकांसहित स्वत:च्या रक्षणाविषयी कृति करण्याचा निर्णय घेण्याचे ठरविले. दाविदाने आपण देवाच्या हातापेक्षा शत्रूच्या हातात सुरक्षित राहू अशी चुकीची समजूत करुन घेऊन पलिष्ट्याच्या देशात पळऊन जाणे पसंद केले.

या समयात दाविदाने जगीक यश अनुभविल्याचे पहावयास मिळते. जेथे कोठे तो गेला तो विजयी ठरला; त्याने धन साठविले; प्रसिद्धि, अधिकार आणि ज्याची त्याला गरज होती ते सर्व मिळवून ते जेता झाला.

तथापी, अनेकदा आपण यश आणि आशीर्वाद हे, देवापासून प्राप्त झालेली दैवी भेट आहे. अशा गोंधळात पडतो. सैतान देखील आपल्याला धन, प्रसिद्धि आणि समृद्धि बहाल करु शकतो. आपल्याला प्राप्त होत असणारे आशीर्वाद हे देवाकडून आहेत किंवा सैतानाकडून हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. जर एकादा आशीर्वाद उदा. व्यवसाय किंवा शिक्षण जर उपासनांना हजर रहाण्यापासून किंवा त्याच्याशी घनिष्ठ नाते जोडण्यापासून दूर ठेवित असेल तर आपण आपल्या प्राधान्य बद्दल विचार करण्याची वेळ आहे. आपण खऱ्या अर्थाने जे काही आनंदाने उपभोगीत आहोत ते देवापासून आहे कां याचा पूर्ण विचार करणे गरजेचे आहे.

आपण करीत असलेल्या निर्दयी हत्यांनी देव संतुष्ट आहे अशी समज करुन घेऊन, आनंदी आणि समाधानी होता. आश्चर्याची बाब म्हणजे या काळात दावीदाने एकही स्तोत्र लिहिलेली दिसत नाही. मला वाटते हाच विचार त्याच्या मागेपुढे न पाहता विचार न करता हत्या करण्याच्या मनोधारणेचा पाया झाला असावा. बायबल सांगते, **"दाविदाने त्या प्रदेशावर मारा केला आणि तेथल्या कोणाहि स्त्री-पुरुषांस जिवंत सोडिले नाही आणि तेथली शेरडे-मेंढरे, गाई-बैल, गाढवे, उंट आणि वस्त्रप्रावरणें घेऊन तो परत आखीशाकडे आला."** (१ शेमुवेल २७:९).

या वागणूकिने त्याला निर्दयी खून्यात बदलले आणि सहज रित्या बेथशिबा इचा पती उरीया याच्याच मृत्युस कारणीभूत ठरला असा कट रचणे शक्य झाले. या कृत्याबद्दल दाविदाने खेद व्यक्त केला नाही, कारण हे बीज त्याजमध्ये पलिष्ट्यांच्या देशात, देवाच्या इच्छे पासून आणि समक्षते पासून दुर असतानाच रुजले गेले होते.

त्याची मजल येथपर्यंत गेली, की इस्त्राएल आणि शौल यांच्या विरोधात लढण्यास तयार झाला. २९व्या अध्यायात

(...पान ८ वर)


# निवासी बायबल कोर्स
## नेहम्या बायबल कॉलेज, चेन्नाई

माध्यम : हिंदी

प्रवेशा करिता त्वरा करा !

Recognised by International Christian Leaders & Senior Pastors for the past 55 years

**ईश्वरविद्या डिप्लोमा**

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.

Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858

E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१३. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१४. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१५. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१६. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१७. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१८. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२१. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२२. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२३. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२४. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२५. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२६. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२७. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२८. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२९. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३०. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३१. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३२. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३३. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३४. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

**WANTED**

**PRINCIPAL**
**for**
**CHRISTIAN MATRICULATION SCHOOL**
**at**
**Chennai.**

We need well qualified, experienced, dedicated, hard working and mission oriented Christian.

Apply to :
E.mail: biblecor@yahoo.co.in
WhatsApp: (+91) 97908 05460

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **Echo of his call Educational Trust** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **State Bank Of India** |
| **Branch** | : | **Triplicane, Chennai - 600 005.** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## विस्मयकारक परंतु सत्य!

"...मानवासारखे परमेश्वराचें पाहणे नसते; मानव बाहेरचे स्वरुप पाहतो पण परमेश्वर हृदय पाहतो." (१ शमुवेळ १६:७)

एकदा, माझा मुलगा, ॲलेक्स सॅमसन आणि मला परदेशात देवाचे वचन देण्याकरिता आमंत्रण देण्यात आले होते. ज्या बंधुने आमंत्रण दिले होते, त्याने आम्हांला आमचा प्रवास खर्च देण्याचे वचन दिले. देवाने त्या देशात जाण्याकरिता आमचे मार्गदर्शन केले आणि वचनाची सेवा अपेक्षेपेक्षा अधीक चांगली झाली. देवाने सामर्थ्यांने कार्य केले आणि त्याच्या स्वत:करिता अनेकांना निवडीले.

सेवेचे दिवस पूर्ण झाल्यानंतर आम्ही परतीच्या प्रवासाची तयारी करीत होतो. तथापी ज्या बंधुने आम्हाला प्रवास खर्च देण्याविषयी वचन दिले होते, त्याला ते पूर्ण करणे शक्य झाले नाही. हे अनेपेक्षितपणे घेतलेले वळण आमच्या पुढच्या प्रवासासाठी आवाहान असे घडले. तरी घटनेने आमची शांति ढळली नाही हे विशेष. जसे वचन आम्हाला आठवण करुन देते, "**आपल्याला ठाऊक आहे की देवावर प्रीति करणाऱ्यांस... सर्व काही त्यांच्या कल्याणार्थ सहकारी असे होते.**" (रोम ८:२८) या वचनाने आम्हास सांत्वन मिळाले.

पुढील शहराकडे जाण्याकरीता जरी आम्ही प्रवास तिकीट अगोदरच खरेदी केले होते, तरी आमच्याकडे जेवणासाठी पैसे नव्हते. आमचे तिकीट कमी किंमतीचे असल्यामुळे, विमान कंपनी आम्हाला पाणी देखील पैसे दिल्याशिवाय देणार नव्हती. विमान आमच्या इच्छित स्थळी पोहचले आणि आम्हा दोघांना भूक आणि तहान लागली.

आश्चर्याची बाब म्हणजे या उद्‌भवलेल्या परिस्थितीबद्दल माझ्या मुलाच्या किंवा माझ्या मनात कटूता आली नाही. दिलेल्या वचनाची पूर्तता न केल्याबद्दल त्या बंधुला देखील दोष दिला नाही. त्याबाबतीत आम्ही दोघेही शांत होतो आणि अंत:करणात दु:ख नव्हते. देवाला गौरव असो!

या दुसऱ्या शहरात आमचे देवाच्या लेकरांनी स्वागत केले; आणि आम्हाला विश्रांती घेण्याच्या ठिकाणी घेऊन गेले व अपेक्षेपेक्षा चांगली काळजी घेतली.

दुसऱ्या दिवशी, एक बंधु आम्हास भेटण्यास आले; आमच्या बरोबर थोडा वेळ बोलले आणि माझ्या हातात एक पाकीट दिले. ते म्हणाले, "**पास्टर, देवाने मला सुचना केली की, मी तुमच्या निकडीच्या गरजेकरिता तुम्हाला हे द्यावे.**" पाकीटात, आम्हाला झालेल्या प्रवास खर्चापेक्षा अधीक पैसे होते. ते पाहून आम्ही अती हर्षीत झालो. ते बंधु आणि त्यांची मंडळी आमचे चांगले मित्र बनले. किती आश्चर्यकारक अचंबित घटना! आम्हाला काही उणे पडले नाही. त्या दिवसापासून देव अशा प्रकारे आमचे मार्गदर्शन करीत आहे.

प्रिय वाचकहो, तुम्ही देखील या देवाची सेवा करण्याची निवड कराल कां? "**तरुण सिंहासहि वाण पडते व त्यांची उपासमार होते; पण परमेश्वराला शरण जाणाऱ्यांस कोणत्याहि चांगल्या वस्तूची वाण पडत नाही.**" (स्तोत्र ३४:१०) "**परमेश्वर किती चांगला आहे याचा अनुभव घेऊन पाहा, त्याजवर भाव ठेवितो तो पुरुष धन्य!**" (स्तोत्र ३४:८)

---

(पान ६ वरुन...)

३-४ या वचनात वाचावयास मिळते. "पलिष्ट्याचे सरदार म्हणाले... जे स्थल तूं त्यास दिले आहे तेथे त्याला परत पाठवून दे; त्याने आम्हांबरोबर लढाईस येऊ नये, तो आला तर तो आमचा वैरी होईल."

एकदा कां देवापासून दूर जाण्याच्या घसरणीस सुरुवात होते, ती उतरती कळा ठरते. दाविदाच्या बाबतीत जलदगतीने ते घडू लागले.

त्याच्या या कृत्यांचा गंभीर परिणाम होता.

तो परत आल्या वर, त्याने कमावलेले सर्व गमावलेले पाहून त्याला धक्का बसला.

१ शमुवेल ३०:१-२, "**दावीद आपल्या मनुष्याबरोबर सिकलाग येथे तिसऱ्या दिवशी पोहचला तेव्हा त्याच्या दृष्टिस पडले की अमालेक्यांनी दक्षिण देश व सिकलाग यावर स्वारी केली असून सिकलागवर मारा करुन; ते अग्नीनें जाळून टाकिले आहे आणि तेथील स्त्रियांस व लहानमोठ्या सगळ्यांस त्यांनी कैद करुन नेले आहे; त्यांनी कोणाची कत्तल केली नाही; तर त्यांचा पाडाव करुन ते आपल्या वाटेने गेले.**"

दावीदाने सर्व गमाविले त्याच्या पत्नींसहीत, त्याच्या बरोबर सर्व ठिकाणी जाऊन सर्व लढाया लढलेल्या लोकांचा विश्वास गमावला.

१ शमुवेल ३०:६ "**दाविद मोठ्या पेचांत पडला कारण... लोक दाविदास दगडमार करावा असे म्हणू लागले.**"

दाविदाला तो अगदी एकटा पडला आहे असे वाटले; सर्वजण त्याच्या विरुद्ध फिरले. त्याचे कुटुंब, कारकीर्द, त्याची बचत आणि प्रसिद्धी सर्व एका रात्रीत

गमावले. त्याचे स्वत:चे लोक त्याजवर हल्ला करण्यास आणि त्याला ठार मारण्यास तयार झाले. ज्याच्यावर विश्वास ठेविता येईल असा कोणीहि नव्हता. त्याच्या समस्या सोडविण्यास किंवा भावना प्रकट करण्यास कोणीहि नव्हता.

पुढारी किंवा नेतृत्व करणारा असण्यात बहुतेकदा एकटे असल्याचा अनुभव येतो. अनुकूल परिस्थितीत पुढाऱ्याला स्तुती मिळते; तथापी सर्व गोष्टि हाताबाहेर जातात, अशावेळी त्याला अंत:करण मोकळे करता येईल असे कोणीहि नसते. इतरांप्रमाणे दावीदाने सर्व काहि गमाविले, तरी देखील त्याच्या भावनेच्या उद्रेकाला वाट करुन देण्यास किंवा आरोळी मारुन दु:ख व्यक्त करण्यास जागा नव्हती. त्याच्या मानसिक तणावाची कल्पना करु शकता कां?

कधीतरी देवापासून दूर रहाणे बरे योग्य वाटते. तथापी, बहुतेकदा देवाचे आपल्यावर अनाकलीनेय आणि अगाध प्रेम असल्यामुळे तो आपल्याला मोकळीक देतो. ते आपल्या पापांच्या आणि आज्ञाभंगाच्याही पलीकडे किंवा वरचढ असते. त्यामुळेच त्याने स्वर्गातील सर्व तेथेच सोडून आपल्याला अनंतकालीक जीवन देण्यासाठी साधे मानवरुप धारण केले.

**''तो देवाच्या स्वरुपाचा असूनहि देवासमान असणे हा लाभ असा त्याने मानिला नाही; तर त्याने स्वत:ला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिमेचे होऊन दासाचे स्वरुप धारण होणे आणि मनुष्यप्रकृतीचें असे प्रकट होऊन त्याने मरण आणि तेहि वध:स्तंभावरचे मरण, सोशिले; इथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वत:ला लीन केले.''** (फिलिप्पै २:६-८)

तो वध:स्तंभावर मरण पावला यासाठी कि आपल्या अस्तीत्वाला जीवन आणि अर्थ प्राप्त व्हावा, आणि जीवनासाठी उद्दीष्ठ पुरविले. तो आपल्याला मोबदला देण्यासाठी पुन: येणार आहे, आणि आपण त्याजवर प्रीति करावी त्याच्या बरोबर व्यक्तिगत रित्या चालण्यात गुंतलेले असावे.

दावीदाला प्रभुमध्ये बळ मिळाले.

बायबल सांगते कि दाविद मोठ्या पेचांत पडला; तथापी ते असेहि सांगते कि, ''दावीद आपला देव परमेश्वर याजवर भिस्त ठेवून खंबीर राहिला. ओहो! सरते शेवटि तो देवापासून किती दूर गेला हे त्याला जाणवले. तो नव्याने सामर्थ्य प्राप्त करण्यास देवाकडे पुन: मागे वळला. दावीदाला लक्षात आले की त्याच्या सामर्थ्याचे स्त्रोत, आणि त्याच्या असहाय स्थितीत त्याला मदत करणारा केवळ देवच आहे. त्याला समजले कि तो त्रासाच्या समयात सदैव उपस्थित रहाणारा आहे. दावीद देवाच्या उपस्थितीत आला आणि पुढे काय करावे याकरिता मार्गदर्शनासाठी सर्व सामर्थी जो त्याजवर अवलंबून आहे हे दर्शविले. यावेळी त्याला देवाच्या शक्तिनिशी पुढे जावेसे वाटत होते.

देव आता या क्षणाला आपल्यापैकी काहि जणांना त्याजकडे बळ, उत्तेजन, क्षमा आणि पुन:स्थापीत होण्याकरीता बोलावित आहे. ज्या ठिकाणी आपण असावे त्या ठिकाणी दाविदाने देवाच्या हातात पडण्यास मागेपुढे पाहिले नाही. आपण देखील तसे करण्यास मागे-पुढे पाहू नये.

बायबल सांगते दाविद देवाकडे परतला तेव्हा दाविदाने सर्व मिळविले. (१ शमुवेल ३०:१८) त्याने गमाविलेले सर्व पुन: मिळविले. कुटुंब, पैसा, प्रसिद्धि, दर्जा, मित्र, मालमत्ता आणि धन. कल्पना करा - दाविदाला सर्व परत मिळाले, केवळ त्याच्यासाठीच नाहि तर त्याच्या सर्व लोकांसाठी देखील. आपण जेव्हा त्याजमध्ये भरोसा करितो, देव जेथे मार्ग नाहि तेथे मार्ग करितो. तो अलौकिक अद्‌भूत दरवाजे उघडू शकतो.

कदाचित तुम्ही स्वत:स दावीदाच्या परिस्थितीत पहात असाल, सर्वकाहि गमाविले आहे असे वाटून आणि ते पुन: प्राप्त होईल कां असा विचार करीत असाल, आणि या स्थितीतून बाहेर पडण्याचा काहि मार्ग आहे कां? मी यावेळी एकटाच आहे.''

प्रिय बंधुनो आणि बहिणींनो, लक्षात असू द्या आपण एकटे नाहि; पित्याकडे धांव घ्या, आणि तो तुमच्या भल्याकरिता सर्वकाही जुळवून आणील.

प्रिय मित्रांनो, दावीदाच्या जीवनातील असंयुक्तिक अध:पात हा त्याच्या विचारांतून आला, तेव्हा आपण काय विचार करीत आहोत याची काळजी घेऊ या, लक्षात असू द्या आपला देव हा दयाळू पिता आहे, तो तुमच्या आणि माझ्या त्याच्याकडे परतण्याची हात पसरुन वाट पहात आहे.

तुम्ही त्याकडे परत फिरणार आहात कां?

******

## वाचकांनो लक्ष द्या!

### पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांची आत्मचरित्र

पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांच्या आत्मचरित्र पुस्तक स्वरूपात छापण्याच्या अंतिम टप्प्यात आहोत. **त्यांच्या सेवेचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याविषयी आम्ही तुमच्याकडून दहा ओळींची साक्ष अपेक्षित आहोत. त्यासोबत आत्मचरित्रात तुमचा फोटो छापण्यात आम्हाला आवडेल.**

**- संपादक**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
**Please subscribe**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.
**- Editor**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***
**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th OCTOBER 2024.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**